**नंदुरबार जिल्ह्यातील वाळू गटांचे व शासकीय जमिनीवरील खाणपट्टयांचे पर्यावरण अनुमती व खाणकाम आराखडा तयार करणेसाठी तसेच जिल्हा सर्वेक्षण अहवाल (District Survey Report) तयार करणेकामी मान्यताप्राप्त पर्यावरण सल्लागार (Environment Consultant), शासकीय जमिनीवरील गौण खनिज खाणपट्टयांचा भूविज्ञानकिय तांत्रिक अहवाल तयार करणेकामी भुविज्ञानकीय तांत्रीक सल्लागार (Geo – Technical Consultant) नेमणूकीची ई- निविदा**

---

क्रमांक/2020/गौखनि/कावि- 82
जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार
नंदुरबार, दिनांक 04/02/2020

जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार यांच्याकडून सर्व मान्यताप्राप्त पर्यावरण सल्लागार (Accreatiated Environment Consultant) व भुविज्ञानकीय तांत्रिक सल्लागार/संस्था (Geo – Technical Consultant) यांना कळविण्यात येते की, नंदुरबार जिल्ह्यातील सन २०१९-२० व २०२०-२१ या ०२ वर्षाकरीता शासन नियमाप्रमाणे प्रस्तावित वाळू गटांचे तसेच शासकीय जमिनीवरील खाणपट्टयांची पर्यावरण अनुमती मिळवण्याकरिता Form १M, EIA, EMP तयार करणे तसेच जाहीर लिलावाव्दारे वाळू गटांचे व शासकीय जमिनीवरील खाणपट्टयांचे जिल्हा सर्वेक्षण अहवाल (District Survey Report) व भूविज्ञानकीय तांत्रीक अहवाल Approved Mining Plan आणि जनसुनावणी या करिता ई-निविदा खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून मागविण्यात येत आहे.

सदर निवेदेची कार्यवाही https://nandurbar.nic.in व https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा प्रसिध्दी | दि. ०७/०२/२०२० | ------ |
| ई-निविदा स्विकृत करण्याचा दिनांक | दि. १३/०२/२०२० | वेळ सायंकाळी ०५.०० वा.पर्यंत |
| ई-निविदा उघडण्याचा दिनांक | दि.१५/०२/२०२० | वेळ सकाळी ११.०० वाजता |

- **पर्यावरण सल्लागार (Accreariated Environment Consultant) पात्रतेचे निकष :-**

१) पर्यावरण सल्लागार (Accreariated Environment Consultant) यांनी "Mining of Minerals" या विभागात Quality Council of India (QCI) किंवा National Accredation Board of Education and training यांच्याव्दारे मान्यता प्राप्त असणे आवश्यक आहे.

२) पर्यावरण सल्लागाराने (Accreariated Environment Consultant) यांना Approved Mining Plan Preperation, पर्यावरण अनुमती मिळविण्यासाठी किमान दोन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. (वाळू घाट (Sand Ghat) Mining Plan Preperation आणि पर्यावरण अनुमती मिळविल्याबाबत अनुभव असलेल्यांना प्राधान्य देण्यात येईल.)

३) पर्यावरण सल्लागाराला तालुका स्तरीय वाळू संनियंत्रण समिती व तालुका स्तरीय तांत्रिक उप समिती यांच्यासह महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांकः गौखनि १०/०२१९/प्र.क्र. ९/ख-१, दि. ०३/०९/२०१९ Sustainble Sand Mining Guidance २०१६ Sand Mining Framework २०१८, मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालय, मा. राष्ट्रीय हरित लवाद यांनी वेळोवेळी दिलेले निर्देश तसेच केंद्र शासनाचा पर्यावरण, व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या मार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना व केंद्र राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना निर्देशचा अधिन राहून कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

४) पर्यावरण सल्लागारांना वाळू गटांची निश्चिती झाल्यानंतर योग्य संनियंत्रणाकरिता वाळू गटांचे Digitization करणे अनिवार्य राहील.

५) पर्यावरण सल्लागारांना वाळू गटाची निश्चिती झाल्यानंतर जिल्हा वाळू संनियंत्रण समिती पुढे तालुकास्तरीय वाळू संनियंत्रण समितीचा शिफारशीसह प्रस्ताव सादर करावे लागेल व जनसुनावणी संबंधी कार्यवाही करावी लागेल. तदनंतर पर्यावरण अनुमती करिता राज्य स्तरीय पर्यावरण प्रभाव मुल्यांकन प्राधिकरण यांचेकडे सादर करेल.

६) मा. राष्ट्रीय हरित लवाद, दिल्ली यांचेकडे दाखल मुळ अर्ज क्र.१८६/२०१६ मध्ये मा. लवादाने दि.१३/०९/२०१८ पारीत आदेशानुसार वाळू गटांची जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

७) वाळू गटांची निश्चिती निविदा करारनामाच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत करणे बंधनकारक राहील.

८) निविदा मान्य झालेल्या पर्यावरण सल्लागार यांना जिल्ह्यातील संपूर्ण वाळू गट निश्चिती DSR तयार करणे, Approved Mining Plan आणि पर्यावरण अनुमती प्राप्त करुन देणे बंधनकारक राहील.

९) एका वाळू गटाकरीता सर्वात कमी किंमत ई-निविदामध्ये प्राप्त होईल ती निविदा वरील अटी व शर्तींच्या अधिन राहुन मान्य करण्यात येईल.

- **भूविज्ञानकीय तांत्रीक सल्लागार/संस्थेच्या (Geo – Technical Consultant) पात्रतेचे निकष :-**

१) भुविज्ञानकीय तांत्रिक सल्लागार/संस्था (Geo – Technical Consultant) खनिज नियम, २०१६ च्या नियम १५ मध्ये खालील प्रमाणे नमूद केलेली तांत्रिक अर्हताप्राप्त व अनुभव धारण असणे आवश्यक आहे.

   (a) A degree in mining engineering or a post-graduate degree in geology granted by a university established or incorporated by or under a Central Act, a Provincial Act or a State Act, including any institutions recognized by the University Grants Commission under section ४ of the university Grants Commissions Act, १९५६ (३ of १९५६) or any equivalent qualification granted by any university or institution ourside India and recognized by Government of India; and

   (b) Professional experience of five years of working in a supervisory capacity in the field of mining after obtaining the degree.

२) महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ आणि महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग, शासन निर्णय क्रमांक : गौखनि-१०/१११८/प्र.क्र.४४८/ख, दि. २३/०१/२०१९ च्या तरतुदी लागू राहतील.

३) खाणकाम योग्य चिन्हांकित क्षेत्रांचा (१ ते ५ हेक्टर पर्यंतचे खनिपट्टा क्षेत्राकरिता) भूविज्ञानकिय तांत्रिक अहवाल तयार करण्यासाठी प्रति हेक्टर सर्वात कमी किंमत ई-निविदा मध्ये प्राप्त होईल, ती निविदा अट क्रमांक १, २ व ३ च्या अधिन राहून मान्य करण्यात येईल.

४) भुविज्ञानकिय तांत्रिक अहवाल संचालक/उपसंचालक यांचे भुविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय हे कार्यालय अथवा त्यांनी प्राधिकृत केलेला सक्षम अधिकारी प्रमाणित करेल आणि गौण खनिज आढळ प्रमाणपत्र दिल्यानंतर कंत्राटाची पुर्ण रक्कम अनुज्ञेय राहील.

५) ज्या गौण खनिज खनिपट्टयांचे लिलावाव्दारे मंजुरी/मान्यता मिळाल्यानंतर पुर्ण रक्कम अनुज्ञेय राहील.

- **सर्वसाधारण अटी व शर्ती**

१) ई-निविदा अर्ज शुल्क रु.२,०००/- ऑनलाईन पध्दतीने भरणा करावे लागेल.

२) ई-निविदा इसारा रक्कम रु. १०,०००/- (EMD) स्वरुपात ऑनलाईन पध्दतीने भरणा करावा लागेल. सदरहू रक्कम ऑनलाईन पध्दतीने आय.सी.आय.सी.आय बॅक खाते क्रमांक ०७६९०५००११०० (IFSC Code ICIC००००७६९) मध्ये जमा करावी लागेल. तसेच अयशस्वी निविदाधारकाची इसारा रक्कम निविदा प्रक्रिया अंतिम झाल्यावर बिनव्याजी परत करण्यात येईल. सदर रक्कमेशिवाय कोणतिही निविदा स्विकारली जाणार नाही.

३) ज्या निविदाधांरकाची निविदा मंजूर होईल अशा निविदाधारकास सुरक्षा रक्कम रु. १,००,०००/- अनामत म्हणून ठेवावी लागेल, सुरक्षा अनामत रक्कम ही धनाकर्ष (डी.डी.) स्वरुपात ४ दिवसाच्या आत जमा करावी लागेल. सदर अनामत रक्कम निविदा धारकाने निविदेतील मुदतीत अटी व शर्तीचे योग्य रित्या पालन केल्यास नमुद कालावधीनंतर परत करण्यात येईल. सदर अटी व शर्तीचा उल्लधंन झाल्यास सदर अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

४) निविदा मान्य झाल्यानंतर रु.२,००,०००/-(रु.दोन लक्ष) बॅक गॅरंटी व करारनामा सादर करणे बंधनकारक राहील.

५) देय असलेल्या रक्कमेवर नियमाप्रमाणे २% आयकर (TDS) व वस्तु व सेवा कर (GST) कपात करण्यात येईल.

६) एकाच व्यक्तीस / संस्था यांना पर्यावरण सल्लागार व भुविज्ञानकीय तांत्रिक सल्लागार या पदासाठी वर नमुद अ.क्र.१ ते ०५ मध्ये नमुद रक्कमांचा भरणा स्वतंत्र रित्या करावा लागेल.

७) सदर निविदा नंदुरबार जिल्ह्यातील वाळू गटांना राज्य स्तरीय पर्यावरण प्रभाव मुल्यांकन प्राधिकरणाकडून पर्यावरण अनुमती मिळविण्याकरिता सन २०१९-२० व २०२०-२१ या वर्षाकरीता आहे.

८) वाळू गटांना राज्य स्तरीय पर्यावरण प्रभाव प्राधिकरणाची मान्यता नंतर पूर्ण रक्कम अनुज्ञेय राहील. तथापि, वाळू गटांचे लिलाव झाल्यावर संबंधित लिलाव धारकाचा नावे पर्यावरण अनुमती वर्ग करुन देणे, Mining Plan व इतर आवश्यक तांत्रिक कागदपत्रे संबंधित लिलाव धारकास हस्तांतरण करणे आवश्यक आहे.

९) राज्य तांत्रिक पर्यावरण मूल्यांकन समिती व राज्य स्तरीय पर्यावरण प्रभाव मुल्यांकन प्राधिकरण यांच्या बैठकीस “Mining of minerals” या प्रवर्गाती In house expert हजर राहणे बंधनकारक राहील व प्रतिनिधी पाठविण्यात येवू नये आणि सदर बैठकीत कुठल्याही प्रकारचे भत्ते अनुज्ञेय राहणार नाही.

१०) निविदा मान्य झाल्यावर रु.१००/- (रु. शंभर मात्र) च्या मुद्रांकावर करारनामा करावा लागेल.

११) अटी व शर्तीचे अनुपालन न केल्यास देय असलेली पूर्ण रक्कम कपात करण्यात येईल अथवा अंशतः कपात करुन रक्कम देण्यात येईल.

१२) पूर्व सूचना न देता कोणत्याही वेळी करार रद्द करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी, नंदुरबार यांना राहील.

१३) निविदेच्या कराराच्या अटी व शर्तीमध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी, नंदुरबार यांना राहील.

१४) प्रशासकीय कारणास्तव निविदा नाकारण्याचे किंवा रद्द करण्याचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील.

१५) सदर प्रकरणी काही वाद उद्भवल्यास नंदुरबार न्याय पालिकेच्या अधिकार क्षेत्रात सोपविण्यात येतील.

१६) मा. न्यायालय व मा. हरित लवाद वेळोवेळी जे आदेश देतील ते लागू राहतील.

१७) निविदा मान्य झाल्यावर कोणतेही अग्रीम रक्कम अनुज्ञेय राहणार नाही.

१८) निविदेमध्ये सहभागी होण्याकरिता आवश्यक कागदपत्रे

**अ) तांत्रिक लिफाफा**

१. मान्यता प्राप्त पर्यावरण सल्लागार / भूविज्ञानकिय तांत्रिक सल्लागार या पदासाठी तांत्रिक अर्हता प्राप्त व अनुभव असल्याचे दस्तऐवज

२. Pan Card

३. Adhar Card

४. GST नोंदणी प्रमाणपत्र

५. दोन वर्षाचा अनुभव असल्याचे प्रमाणपत्र

६. Income Tax Return मागील वर्षातील

७.रु.१००/- च्या मुद्रांकावर निविदामधील अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र

**ब) आर्थिक लिफाफा**

१. दर BOQ मध्ये सादर करुन अपलोड करावा.

(दत्तात्रय बोरुडे)
**जिल्हाधिकारी, नंदुरबार**